महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

क्रमांकः प्रतिनि-२०१६/प्र.क्र.१९२/का.१४

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:.२९.०५.२०१९

संदर्भ :- १) शासन आदेश क्र.प्रतिनि-२०१६/प्र.क्र.१९२/१६/चौदा, दि.२८.१२.२०१६
२) शासन आदेश क्र.प्रतिनि-२०१६/प्र.क्र.१९२/१६/चौदा, दि.१०.०१.२०१८
३) शासन आदेश क्र.ससप-१११७/प्र.क्र.१२४/का.१४, दि.२८.०८.२०१८
४) शासन आदेश क्र.प्रतिनि-२०१६/प्र.क्र.१९२/१६/चौदा,दि.२१.०२.२०१९

आदेश

श्री.मा.ना.काळे, सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांची संदर्भ क्र.१ येथील शासन आदेशान्वये गृह (परिवहन) विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. संदर्भ क्र.२ येथील आदेशान्वये प्रतिनियुक्तीस दि.२७.१२.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तद्नंतर श्री.मा.ना.काळे, सह सचिव यांना संदर्भ क्र.३ येथील शासन आदेशान्वये सह सचिव पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात येऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामधील महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) या प्रतिनियुक्तीच्या पदावर प्रपत्र बढती देण्यात आली होती. या प्रपत्र बढतीस संदर्भ क्र.४ येथील आदेशान्वये दि.३१.०५.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. आता, या आदेशान्वये श्री.मा.ना.काळे, सह सचिव यांनी विनंती केल्यानुसार त्यांची महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) या पदावरील प्रपत्र बढती संपुष्टात आणण्यात येत असून, या प्रतिनियुक्तीच्या पदावरुन त्यांच्या सेवा दि.३०.०५.२०१९ (म.नं.) पासून प्रत्यावर्तित करण्यात येत आहेत. त्यांची प्रत्यावर्तनानंतरची पदस्थापना दि.३१.०५.२०१९ (म.पू.) पासून सामान्य प्रशासन विभागातील सहसचिव पदावर करण्यात येत आहे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०५२९१७४१५०९९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Gajanan
Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.05.29 17:47:03 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
२) मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स.

३) अ.मु.स (सेवा), सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई.

४) अ.मु.स./प्र.स./सचिव, गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय, मुंबई.

५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मर्यादित, मुंबई.

६) सह/उप सचिव (आस्थापना), सामान्य प्रशासन विभाग/ गृह (परिवहन)विभाग, मंत्रालय, मुंबई

७) श्री.मा.ना.काळे, सह सचिव

८) निवड नस्ती कार्या.१४